## जागतिक पोलीस व फायर गेम्स् २०१९, चेंगडू, चीन येथे महाराष्ट्र पोलीस आर्चरी खेळाडू मोनाली जाधव हिचा स्पर्धा विक्रम

### (२ सुवर्ण व एक कांस्य पदक)

मपोशि/२२६९, मोनाली जाधव, नेमणूक - बुलडाणा हिने चेंगडू, चीन येथे दि. ८ ते १८ ऑगस्ट २०१९ या कालावधीमध्ये सुरु असलेल्या जागतिक पोलीस व फायर गेम्स् स्पर्धा - २०१९ करीता भारतीय पोलीस आर्चरी संघाचे प्रतिनिधीत्व करणारी महाराष्ट्र पोलीस दलातील मपोशि / मोनाली जाधव, नेमणूक - बुलडाणा हिने टार्गेट आर्चरी प्रकारात ७२० पैकी ७१६ गुणांसह स्पर्धा विक्रमाची नोंद करुन सुवर्ण पदक पटकाविले. तसेच फिल्ड आर्चरी प्रकारामध्ये सुवर्ण पदक आणि 3D आर्चरी मध्ये कांस्य पदक प्राप्त करुन महाराष्ट्र पोलीस दलाचे व भारतीय पोलीस दलाचे नाव लौकीक केलेले आहे.

बुलडाणा जिल्हयातून स्वत:च्या मनगटाच्या बळावर विविध मैदानावर / टार्गेटवर आपल्या आर्चरीतून एकएक निशाणा टिपत राष्ट्रीय पोलीस स्पर्धेमध्ये ३ सुवर्ण पदके पटकावून थेट चीन येथे भारतीय पोलीस संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहे.

यापूर्वी मोनाली जाधव, यांची प्रथम विश्वकप आर्चरी स्पर्धा - (२) २०१९, शांघाय, चीन (दि. ६ ते १२ मे २०१९) येथील स्पर्धेत भारतीय संघामधून सहभागी झाली होती व जागतिक क्रमवारी मध्ये ९ वे स्थान प्राप्त केले होते.

बुलडाणा पोलीस दलात सन २०१३ मध्ये महिला पोलीस शिपाई या पदावर भरती झालेली मोनाली जाधव या २५ वर्षीय तरुणीने स्वत:चे योगदान स्वत:च मांडले आहे. तिच्या यशस्वी कारकिर्दीला १४ वर्षे सेनादलात असलेले व महाराष्ट्र पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई म्हणून पुनश्च पोलीस दलात भरती झालेले राष्ट्रीय आर्चरी प्रशिक्षक चंद्रकांत इलग यांनी तिच्यामधील कौशल्य व जिद्द ओळखून नागपूर पोलीस मुख्यालय येथे आर्चरीचे धडे दिले. यामुळे अवघ्या दोन वर्षात ती सुवर्ण पदकांची मानकरी ठरली असून, इतर प्रशिक्षणार्थी साठी ती आज प्रेरणादायी ठरत आहे.

महाराष्ट्र पोलीस दलामधील मपोशि / २२६९, मोनाली जाधव यांची आजपर्यंतची सर्वोत्कृष्ठ कामगिरी असून श्री. सुबोधकुमार जायसवाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. संजीवकुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, श्री. कृष्ण प्रकाश, विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रशासन) म. रा. मुंबई, श्री. दिलीप भुजबळ पाटील, पोलीस अधीक्षक, बुलडाणा व सहाय्यक क्रीडा अधिकारी श्री. बाजीराव कळंत्रे, आणि देखरेख अधिकारी भारतकुमार ठाकूर व आर्चरी प्रशिक्षक - चंद्रकांत इलग व सहप्रशिक्षक - सुरेश शिंदे, यांनी वेळोवेळी तिला प्रोत्साहन देवून मार्गदर्शन केले. तसेच मुंबई येथील क्रीडा मानसशास्त्रज्ञ डॉ. शिल्पा देसाई (C4 वेलनेस) यांनी महाराष्ट्र पोलीस दलामधील खेळाडूंचे परिक्षण करुन त्यांच्यामधील उणिवा दूर करुन खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहिल याकरीता केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत.

19/8

(बाजीराव कळंत्रे)
सहाय्यक क्रीडा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पोलीस, मुंबई.


员运动会
Fire Games
份


CHENGDU · 2019
WORLD
POLICE & FIRE
GAMES
中国·成都 2019
第十八届世界警察和消防员运
Chengdu · 2019 World Police & Fire
小口径步枪
步枪
射箭
Rifle Small Bor
ifle-Air
小口径步枪
2
1
3


To Promote
Physical Fitness Among the Law
Enforcement and Firefighting Community
WE ARE THE WORLD'S PRIMARY DEFENDERS
OF LIFE AND PROPERTY. WE ARE
PEACE OFFICERS AND
FIREFIGHTERS.